नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 11/08/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

## पोस्टे बुट्टीबोरी हद्दीतील दुधामांगली शिवारात सुरु असलेल्या अवैध जुगारावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड
## एकुण 8,29,480/- रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक 10.08.2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक उपविभाग नागपूर हद्दीत पेट्रोलींग करीत असता पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर बातमी मिळाली की, पोस्टे बुट्टीबोरी हद्दीत दुधामांगली शिवारात बॅटरीवर एलएडी लाईट लावुन त्याच्या प्रकाशात अवैधरित्या ताशपत्त्याचा जुगार सुरू असल्याचे माहितीवरून दुधामांगली शिवारात धाड टाकली असता घटनास्थळावरून नगदी 30,830/- रू., 05 मोबाईल संच, 03 मोटर सायकल, 01 स्वीफ्ट डिझायर कार व जुगाराचे साहित्य असा एकुण 8,29,480/- रू चा माल आरोपी नामे 1) अजय राजेंद्र बागडे वय 30 वर्षे, 2) स्वप्नील पुरूषोत्तम बारसिंगे वय 26 वर्षे, 3) अनिकेश उर्फ पंडा रामदरस दुबे वय 30 वर्षे, 4) मनोहर मुन्ना बघीया 23 वर्षे, सर्व रा. नागपूर 5) चंदु बारबा ढेंगरे वय 45 वर्षे रा. बुट्टीबोरी, 6) गोपाल मारोतराव भलावी वय 44 वर्षे रा. असोला यांचे ताब्यातुन सदरचा माल जप्त करण्यात आला. आरोपीतांविरूध्द पोस्टे बुट्टीबोरी येथे महाराष्ट्र जुगार कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा.पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, महेश जाधव, पोलीस नायक रामराव आडे, पोलीस शिपाई अमृत किनगे यांनी पार पाडली.



## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. भिवापुर :– फिर्यादी नामे– सौ शितल सतिश गुप्ता वय 34 वर्षे, रा. भाटापारा मंडी रोड संजय वार्ड जि. बलोदा बाजार राज्य छत्तीसगढ, ह.मु भिमादेवि रोड भिवापुर राहुल गुप्ता याचे घरी हिचे आरोपी नामे– 1) पति– सतिश गुप्ता याच्या सोबत 2019 मध्ये रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले असून त्याच्या पासुन तिला एक वर्षाची मुलगी आहे. फिर्यादी हिला मुलगी झाली म्हणुन अंतर्गत भाटापारा मंडी रोड संजय वार्ड जि. बलोदा बाजार राज्य छत्तीसगढ येथे दिनांक 25/10/2020 चे 05.30 वा. ते दिनांक 28/10/2020 पर्यंत तिचे सासर चे लोक आरोपी नामे– 1) सतिश गुप्ता, 2) सासू विमला गुप्ता, 3) नंदोई सरोज गुप्ता, 4) नंनद सुमन गुप्ता, 5) शारदा गुप्ता व 6) रामकुमार गुप्ता सर्व रा. भाटापारा मंडी रोड संजय वार्ड जि. बलोदा बाजार राज्य छत्तीसगढ हे तिला जास्त त्रास देवु लागले व लग्नामध्ये हुंडा आणला नाही म्हणुन तिला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. फिर्यादीने तिच्या भावाला फोन करून सर्व हकिकत सांगीतली तर आई वडील व भाऊ हे दि 29/10/2021 ला भिवापुर येथे घेवुन आले. भिवापुर ला येवुन सासु, ननंद पति, नंदई यांचे विरूदध तक्रार दिली. त्या तक्रारी वरून नागपुर भरोसा सेल येथे पाठविले असता दिल्या तारखेवर फिर्यादी या गेल्या पण तिचे सासरचे लोक एकही आले नाही. त्यामुळे भरोसा सेल नागपुर यांनी पोस्टे ला पत्र पाठवुन पास्टे ला सदर गुन्हा नोंद केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 323, 504, 506, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चंद्रकान्त रेवतकर 8888102302 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावरील बोरखेडी टोलनाका येथे दिनांक 10/08/2020 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अभिषेक वसंतराव गजरे, वय 23 वर्ष, रा. तेलीपुरा चकोले शिवरपेठ नागपुर जि. नागपुर हा ओला कॅबने प्रवासी घेवुन यवतमाळ वणी येथे जात असता बोरखेडी टोलनाक्यावर फिर्यादी याच्या ओला कॅब फास्टटॅग चे खात्यातुन नाक्याचे पैसे कटले. यानंतर ग्रीन सींगल जाण्याकरीता झाले परंतु लोखंडी पोल ही ग्रीण सिग्नल लागुनही उभे न झाल्यामुळे तेथील काम करणारे कर्मचारी यांना लोखंडी पोल उभे करण्यास बोलले असता त्याने फिर्यादी यांना शिवीगाळ केली. त्याला शिवीगाळ का करता असे विचारले असता बोरखेडी टोलनाक्यावरील काम करणारे ड्रेसवरील 7 ते 8 लोक आले व त्यांनी फिर्यादी याला शिवीगाळ करून हातबुक्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादी चे कॅब कारमध्ये बसलेले ग्राहक सुरेंद्र पटले हे भांडण सोडवीण्यास आले असता त्यांना सुद्धा टोलनाक्यावरील लोकांनी शिवीगाळ करून हातबुक्यांनी मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,148,149,323,504 भादंवी, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुरेश धवराळ 9765497005 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर